# रविवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२४ रोजी ब्राह्मण सभा मालाड, मुंबई येथे आयोजित ३२व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

अभ्यंकर मंडळाची ३२वी वार्षिक सर्वसाधारण सभा व स्नेह संमेलन रविवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० वा. ब्राह्मण सभा मालाड, येथे संपन्न झाले. चहा नाश्ता झाल्यावर संमेलनास सुरवात झाली.

उपस्थितांचे स्वागत करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. भगवान श्री परशुराम, श्री योगेश्वरी देवी श्री व्याडेश्वर व श्री गणपती च्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. सौ धनश्री अभ्यंकर ठाणे यांनी “श्रीसुक्त” सादर करून सर्वांची मने जिंकली. तद्नंतर ज्ञात व अज्ञात दिवंगत अभ्यंकराना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

श्री. विजय भास्कर अभ्यंकर विरार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रथेप्रमाणे उपस्थितांतून श्री शशांक सदाशिव अभ्यंकर, राहणार दहिसर, मुंबई यांची संमेलनाध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. मंडळाचे अध्यक्ष श्री निशिकांत शंकर अभ्यंकर यांनी अध्यक्ष स्थान भूषविले.

संमेलनाध्यक्षांचा परिचय करून दिल्यानंतर श्री निशिकांत शंकर अभ्यंकर यांनी श्री शशांक सदाशिव अभ्यंकर, यांचे शाल, श्रीफळ व पुष्प गुच्छ देऊन स्वागत व सत्कार केला. संमेलनाध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरवात करण्यात आली. या वेळी खालील ठराव सर्वानुमते संमत करण्यात आले .

१) दिनांक ०७ जानेवारी २०२४ रोजी श्री काशीकर मंगल कार्यालय, मिरज येथे झालेल्या ३१व्या सभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

२) सन २०२३-२०२४ चा जमा-खर्च व ताळेबंद अहवालाचे वाचन करण्यात येऊन सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

३ ) मंडळाचे सन २०२४ -२५ या वर्षाकरिता सनदी लेखापाल यांची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचे मानधन ठरविण्याचे अधिकार कार्यकारणीस देण्यात यावे असा प्रस्ताव मांडण्यात आला.

सूचक: चन्द्रशेखर अभ्यंकर    अनुमोदक: धनाश्री अभ्यंकर

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

- **अभ्यंकर मंडळाचे Current Account टीजेएसबी बँक, ठाणे येथे उघडण्यास सर्वसाधारण सभेची परवानगी :** सचिवांनी उपस्थित सर्व सभासदांना अशी माहिती दिली की टीजेएसबी बँक, ठाणे यांनी अभ्यंकर मंडळाला रिझर्व बँकेच्या आदेशानुसार आयकर विभागाकडून जारी केलेले “Tax Exemption” प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले होते परंतु ते मंडळाकडे नसल्याने टीजेएसबी बँक, ठाणे यांच्या निर्देशानुसार अभ्यंकर मंडळाला रिझर्व बँकेच्या आदेशानुसार Savings बँक खाते चालू ठेवण्यास परवानगी नाही म्हणून टीजेएसबी बँक, ठाणे यांनी Current Account उघडण्याचे निर्देश दिले आहे. या विषयावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली व रिझर्व बँकेच्या आदेशानुसार अभ्यंकर मंडळाकडे आयकर विभागाकडून जारी केलेले “Tax Exemption” प्रमाणपत्र नसल्याने टीजेएसबी बँक, ठाणे यांच्या निर्देशानुसार अभ्यंकर मंडळाचे Savings बँक खाते बंद करून टीजेएसबी बँके, ठाणे येथे “Current Account” उघडण्यास सभेनी सर्वानुमते परवानगी दिली.
  ठराव सर्वानुमते सम्मत करण्यात आला.
  सूचक: विजय भास्कर अभ्यंकर अनुमोदक: अशोक विद्याधर अभ्यंकर

- उद्योग क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या उद्योजकाला कै. मंगला गोपाळ अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ शाल, श्रीफल, पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन “उद्योगश्री पुरस्कार” पुरस्कारार्थी:

  **१) सौ धनश्री अभ्यंकर, डहाणू (विद्युत रोषणाई साठी लागणाऱ्या माळा बनविण्याचा लघु उद्योग. त्यायोगे गावातील महिलांना रोजगार)**

- विशिष्ट क्षेत्रात विशेष नैपुण्य प्राप्त करणाऱ्यां मान्यवरांना कै. ज. द. अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ पुष्पगुच्छ शाल, श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन “नैपुण्य पुरस्कार” पुरस्कारार्थी:

  **१) चन्द्रशेखर सदाशिव अभ्यंकर, विरार(सिव्हिल इंजिनिअर असून कीर्तनातून गावोगावी लोकजागर करणारा व्रती)**

- कै. सुधाकर कृष्णाजी उर्फ बापू अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ आजीव सभासदांपैकी ज्यांच्या पाल्याने १०वी, १२वी, स्नातक वा स्नातकोत्तर परीक्षा उत्तीर्ण केल्या बद्दल खालील व्यक्तींना पुष्पगुच्छ व सम्मान चिह्न देऊन जाहीर सत्कार करण्यात आला

  **पुरस्कारार्थी:**
  **१) रुची अभ्यंकर**
  **२) अक्षता अभ्यंकर**
  **३) अंकिता अभ्यंकर**
  **४) अक्षय अभ्यंकर**

- आजीव सभासदांपैकी ज्या दांपत्याच्या विवाहाला ५० वर्ष पूर्ण झाली आहेत त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार.

  **१) श्री अशोक विद्याधर अभ्यंकर व सौ अर्चना अशोक अभ्यंकर**
  **२) श्री शशिकांत वामन अभ्यंकर व सौ शैलजा शशिकांत अभ्यंकर**
  **३) श्री आनंद वासुदेव अभ्यंकर व सौ अरुणा आनंद अभ्यंकर**
  **४) श्री माधव अभ्यंकर व सौ सुषमा माधव अभ्यंकर**

- **आजीव सभासदांपैकी ज्या व्यक्तींनी ७५व्या वर्षात पदार्पण केले आहे त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार.**

  **१) श्री सुरेश अभ्यंकर, कळवा, (ठाणे)**
  **२) श्रीमती गीता गोपाल केळकर, बदलापूर**
  **३) श्री अशोक विश्वनाथ अभ्यंकर, डहाणू**
  **४) श्री अजितचंद्र विनायक अभ्यंकर, ठाणे**
  **५) श्रीमती लीना माधव अभ्यंकर, मालाड, मुंबई**

**डॉ.(सौ) संपदा लीलाधर अभ्यंकर यांच्या हस्ते उपस्थित माहेरवाशिणींचा मंचावर आमंत्रित करून व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित माहेरवाशीणींनी आपले मनोगत व्यक्त केले .**

मंडळाला देणगी दिलेल्या खालील देणगीदारांचा सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला:-

**१) श्रीमती शैलजा भास्कर अभ्यंकर, ठाणे**
**२) श्री महेश अभ्यंकर, गोरेगांव**
**३) सौ अर्चना अशोक अभ्यंकर, ठाणे**
**४) सौ अरुणा अभ्यंकर, मुंबई**
**५) श्रीमती एम एस भिडे, मुंबई**
**६) श्री शशिकांत अभ्यंकर, मुंबई**
**७) श्रीमती गीता गोपाळ केळकर, बदलापूर**
**(८) सौ नीता जोशी, मुंबई**
**(९) सौ अलका मेढेकर, विलेपार्ले**

मंडळाचे सचीव श्री विवेकानंद दतात्रय अभ्यंकर यांनी अभ्यंकर ई-कुल्वृतांत व मंडळाच्या वेबसाइट वर उपलब्ध विविध विषयावर सविस्तर माहिती दिली.

तद्नंतर डॉ. महेश अभ्यंकर यांनी “आरोग्यपूर्ण शतकोत्तरी” या विषयावर सविस्तर व मनमोकळेपणे व्याख्यान सादर केले व उपस्थितांची मने जिंकली. सर्वांनी टाळ्या वाजवून त्यांना मन:पूर्वक धन्यवाद दिले.

संमेलनाध्यक्ष श्री शशांक सदाशिव अभ्यंकर, यांनी आपले विचार व्यक्त करून सभेस मार्गदर्शन केले व कोविड काळात त्यांनी त्यांच्या सहकार्याच्या मदतीने केलेल्या अभूतपूर्व कार्याची माहिती दिली. सर्व उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले.

मंडळाचे अध्यक्ष श्री निशिकांत शंकर अभ्यंकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले व वार्षिक सर्वसाधारण सभेला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याबद्दल आवाहन केले तसेच संमेलन यशस्वी करण्यास हातभार लावणाऱ्या सर्वांना धन्यवाद दिले

श्री दिलीप अभ्यंकर, बदलापूर यांनी सर्व उपस्थितांचे आजच्या सभेस उपस्थित राहिल्याबद्दल तसेच ब्राहमण सभा, मालाड व जोशी केटरर्स व हॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल व्यवस्थकांचे आभार मानले.

पसायदान, राष्ट्रगान व सुरूची भोजनाने सभेची सांगता झाली.